# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ११/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## पुलाचे कामावरील लोखंडी सेन्ट्रीग प्लेटा चोरी करणारी टोळी अटक

दिनांक ३१/०१/२०२२ रोजी फिर्यादी नामे— पांडुरंग राजेभाउ लष्कर, वय २४ वर्ष, रा. वृंदावन सोसायटी, गुमगाव ता. हिंगणा जि. नागपूर यांनी पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे तक्रार दिली की, दि. २८/०१/२०२२ चे रात्री २४.०० वा. ते दि. २९/०१/२०२२ चे ००.३० वा. सालईधाबा येथील पुलाचे कामाकरीता साईडवर ठेवलेल्या लहान मोठया आकाराच्या लोखंडी सेन्ट्रींग प्लेटा ९३ नग कि. ३०,०००/—रू. किमतीचा माल अज्ञात आरोपीने चोरून नेले. अश्या फिर्यादीचे रिपोर्ट वरून अप क्र. ४०/२०२२ कलम ३७९, ४११, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. उपविभागीय पोलिस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. एमआयडीसी बोरी चे पोलिस निरीक्षक श्री अशोक कोळी यांनी परि पोउपनि श्री ओम कलेगुरूवार यांचे सह गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोहवा ईकबाल शेख, शैलेन्द्र नागरे, प्रफुल राठोड, किशोर डेकाटे, पो.अ. रमेश नागरे व सायबर चे पो.अ. सतीश राठोड यांनी सदर गुन्हयात तपासाची सुत्रे हलवुन गुप्त दाराकडुन माहीती चे आधारे पो.स्टे. एमआयडीसी नागपूर शहर हद्दीतील संशयीत आरोपी क्र. १. संतोष नरेंद्र चौधरी, वय २२ वर्ष, २. विशास सुदर्शन गोंड, वय २३ वर्ष, ३. आतीष श्रवण गोंड, वय २० वर्ष, तिन्ही रा. वाघधरा वार्ड क्र. २ ईसासनी ता. हिंगणा जि. नागपूर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता. त्यांनी सुरूवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली. परंतु पोलिस खाक्या दाखतांच त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यांना सदर गुन्हयात दि. १०/०२/२०२२ चे १०.५० वा. अटक करून मा. कोटातुन एक दिवस पोलिस कस्टडी रिमांड प्राप्त करून सदर गुन्हयातील माल हा खापरखेड येथे विक्री केल्याचे आरोपी क्र. ४. अजय मोतीलाल शाहु, वय ५६ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, खापरखेडा यांचे कडुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेला माल लहान मोठया आकाराच्या लोखंडी सेन्ट्रीग प्लेटा ९६ नग कि. ३०,०००/—रू. चा माल व गुन्हयात वापरलेले वाहन एमएच—४०/बीएल—६६१७ क्रमांकाची टाटा एस गाडी कि. २,००,०००/—रू. असा एकुण कि. २,३०,०००/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर